| | |
|---|---|
| | दाखल दिनांक: १४/०३/२०१६ |
| | नोंदणी दिनांक : १४/०३/२०१६ |
| | निकाल दिनांक: १६/०४/२०२६ |
| CNR No. MHSI09-000043-2016 | कालावधी : १० वर्षे ०१ महिने ०२ दिवस |

**<u>दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर देवगड यांचे न्यायालयात,</u>**
( पिठासीन अधिकारी : श्रीकांत एस. पचंडी )

<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १५/२०१६</u>
निशाणी क्र. – १६८

वसंत बाबाजी मासये
वय ५० वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग ... ...**वादी**

**विरुध्द**

१) दिलीप रामचंद्र मासये,
वय ४५ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. संघर्ष चाळ, सेवा मंडळ, पाईप लाईनच्यावरती,
गायत्री शाळेच्या मागे गावदेवी रोड,
तुळशेतपाडा, भांडुप पश्चिम मु. नं. ७८

२) निर्मला रामचंद्र मासये उर्फ विशाखा विलास कुळकर
वय ३५ वर्षे, धंदा – गृहिणी व शेती
रा. दाभोळे, घाडीवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३) वनिता रामचंद्र मासये उर्फ कल्पना रामचंद्र घाडी
वय ३८ वर्षे, धंदा – गृहिणी व शेती
रा. तिर्लोट (घाडीवाडी)
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग ... ... **प्रतिवादी**

४) विष्णू गणपत मासये (**मयत**)
त्यांचे वारस
४अ) सुनिल विष्णू मासये
वय ४० वर्षे, धंदा – नोकरी,
रा. शिवकृपा अपार्टमेन्ट, रुम नं.०६,
बेडेकर नगर, दिवा (पूर्व)

४ब) दयानंद विष्णू मासये
वय ३६ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. लक्ष्मण चाळ रुम. नं.४,
रामनगर, टेंबीपाडा, तानाजीवाडी,
भांडूप (पश्चिम)

४क) सरीता विष्णू मासये उर्फ सुप्रिया संतोष घाडी
वय ३६ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. मु.पो.एडगांव, घाडीवाडी,
ता.वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग

५) सदाशिव लक्ष्मण मासये
वय ६० वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

६) मधुकर लक्ष्मण मासये
वय ५८ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

७) जगन्नाथ लक्ष्मण मासये
वय ५६ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग ... ... **प्रतिवादी**

८) प्रकाश लक्ष्मण मासये
वय ५४ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

९) संजय लक्ष्मण मासये
वय ५० वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

१०) लाडूबाई लक्ष्मण मासये उर्फ पल्लवी नारायण अनभवणे
वय ५२ वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

११) मनोहर महादेव मासये
वय ५७ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– ओसवाल टॉवर, बि.नं.४, 'बी' विंग रूम नं.१०६,
पहिला माळा, बी. पी रोड, खारेगाव,
भाईंदर पूर्व, जि. ठाणे, पिन कोड ४०११०५

१२) नारायण महादेव मासये
वय ५४ वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

१३) शशिकला महादेव मासये उर्फ स्मिता अनंत अनभवणे
वय ५६ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग ... ... **प्रतिवादी**

१४) दत्ताराम भिकाजी मासये
वय ५२ वर्षे, धंदा – निवृत्त,
रा.– बी १०४, संस्कृती को. ऑप. हौ सोसा. खरोडी नाका,
बोळींज, विरार पश्चिम, ता. वसई, जि. ठाणे.

१५) सतिश भिकाजी मासये
वय ४५ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– ओसवाल टॉवर, बि. नं. ४, 'बी' विंग रूम नं. १०६,
पहिला माळा, बी. पी. रोड, खारेगाव,
भाईंदर पूर्व, जि. ठाणे, पिन कोड ४०११०५

१६) नितीन भिकाजी मासये
वय ४२ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– ओसवाल टॉवर, बि. नं. ४, 'बी' विंग रूम नं. १०६,
पहिला माळा, बी. पी. रोड, खारेगाव,
भाईंदर पूर्व, जि. ठाणे, पिन कोड ४०११०५

१७) संगिता भिकाजी मासये उर्फ स्वाती रामचंद्र गुरव
वय ४७ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा.– ओसवाल टॉवर, बि. नं. ४, बी' विंग रूम नं. १०६,
पहिला माळा, बी. पी. रोड, खारेगाव,
भाईंदर पूर्व, जि. ठाणे, पिन कोड ४०११०५

१८) प्रभावती भिकाजी मासये
वय ७५ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

१९) कृष्णा गोविंद मासये **(मयत)**
त्यांचे वारस
१९अ) वासंती कृष्णा मासये
वय ७० वर्षे, धंदा – गृहिणी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग **... ... प्रतिवादी**

१९ब) अशोक कृष्णा मासये
वय ६० वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– संघर्ष चाळ, रुम नं.४३, पाईप लाईन दत्तमंदिर,
तुलसीपाडा, गावदेवी रोड, भांडूप–४०००७८

१९क) रविंद्र कृष्णा मासये
वय ५२ वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (खालचीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

१९ड) सुनिता एकनाथ धुमाळ
वय ५५ वर्षे, धंदा – गृहिणी
रा.– गायत्री विद्यामंदिर २६, सदोस्वार सेवा मंडळ चाळ,
पाईप लाईन, रुम नं.५९,
तुळशेतपाडा, भांडूप (प.) नं.–४०००७८

२०) शोभा तुकाराम मासये
वय ६५ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२१) सदानंद तुकाराम मासये
वय ४० वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२२) संदीप तुकाराम मासये
वय ३८ वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२३) लवू तुकाराम मासये
वय ३५ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग ... ... **प्रतिवादी**

२४) अंकुश तुकाराम मासये
वय ३५ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२५) समीर तुकाराम मासये
वय ३० वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२६) जयश्री सिताराम मासये
वय ६५ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२७) सखाराम अनंत मासये
वय ६२ वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२८) नामदेव यशवंत मासये (**मयत** )
त्यांचे वारस
२८अ) प्रेमलता नामदेव मासये
वय ७५ वर्षे, धंदा – घरकाम,
रा.– ९ वा माळा, रुम नं.९०७, बिल्डींग नं.२,
महाकाली दर्शन, एस.आर.ए., गुंदवली गावठाण,
आझाद रोड, अंधेरी पूर्व, मुंबई –४०००६९

२८ब) श्रीकांत नामदेव मासये
वय ४० वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– ९ वा माळा, रुम नं.९०७, बिल्डींग नं.२,
महाकाली दर्शन, एस.आर.ए.,
गुंदवली गावठाण, आझाद रोड,
अंधेरी पूर्व, मुंबई –४०००६९ … … **प्रतिवादी**

२८क) संतोष नामदेव मासये
वय ३८ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– ९ वा माळा, रुम नं.९०७,
बिल्डींग नं.२, महाकाली दर्शन,
एस.आर.ए. , गुंदवली गावठाण,
आझाद रोड, अंधेरी पूर्व, मुंबई –४०००६९

२८ड) सरिता हरिश शिंदे
वय ४५ वर्षे, धंदा – घरकाम,
रा.– ९ वा माळा, रुम नं.९०७,
बिल्डींग नं.२, महाकाली दर्शन,
एस.आर.ए. , गुंदवली गावठाण,
आझाद रोड, अंधेरी पूर्व, मुंबई –४०००६९

२९) राजेंद्र यशवंत मासये (**मयत** )
त्यांचे वारस
२९अ) सुचिता उर्फ भारती राजेंद्र मासये
वय ५५ वर्षे, धंदा – घरकाम,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२९ब) आकांक्षा राजेंद्र मासये
वय २५ वर्षे, धंदा – घरकाम,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३०) चंद्रकांत बाबाजी मासये
वय ६२ वर्षे, धंदा – निवृत्त,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३१) दशरथ बाबाजी मासये
वय ६० वर्षे, धंदा – शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग ... ... **प्रतिवादी**

३२) सुर्यकांत बाबाजी मासये
वय ४५ वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३३) मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदूर्ग ओरोस

जनाबाई रावजी मासये (**मयत**)
उर्फ द्रौपदी रावजी वारीक यांचे वारस
श्रीधर रावजी वारीक मयत वारस,

३४) शारदा श्रीधर वारीक
वय ४५ वर्षे, धंदा – शेती,
रा.– नाडण, वारीकवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३५) प्रकाश श्रीधर वारीक
वय ३० वर्षे, धंदा – शेती,
रा.– नाडण, वारीकवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३६) सुनिल श्रीधर वारीक
वय २८ वर्षे, धंदा – शेती,
रा.– नाडण वारीकवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३७) संदिप श्रीधर वारीक
वय २६ वर्षे, धंदा – शेती,
रा.– नाडण, वारीकवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग ... ... **प्रतिवादी**

| | |
|---|---|
| वादी तर्फे विधीज्ञ | श्री.पी.व्ही.बोडस |
| प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ | श्री.व्ही.आर. नाईक |
| प्रतिवादी क्र.२, ३, १०, १३, १९अ, १९क, १९ड, २८अ, २८क, २८ड, २९ब, ३३, ३४, ३५, ३६, ३७ | एकतर्फा |
| प्रतिवादी क्र.४अ ते ४क तर्फे विधीज्ञ | श्री. एल.एल. नाथगोसावी |
| प्रतिवादी क्र.५ ते ९, ११, १२, १४ ते १८, २० ते २७, ३० ते ३२ तर्फे विधीज्ञ | श्री. आय.व्ही.ठाकूर |
| प्रतिवादी क्र.१९ब, २८ब, २९अ, तर्फे विधीज्ञ | श्रीमती आर.एस.दामले |

## न्या य नि र्ण य

( अधिघोषीत दिनांक १६ एप्रिल २०२६ )

प्रस्तुत दावा वादीने वाटपा करिता दाखल केला आहे.

**दाव्यातील संक्षिप्त वाद कथन खालील प्रमाणे** –

०२. दावा मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

गाव मौजे मोंड, मळेगाव व चिंचवाड ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

## परिशिष्ट 'अ'

गाव मौजे मोंड, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील मिळकतींचा तपशील खालील प्रमाणे

| अ.नं. | सर्वे नं. | हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | (२)२ | १ | ०.३९.०<br>०.१३.० | ०.३३ | मोंडथरा घरपर्डे |
| २ | (३)३ | २/३बी | ०.०१.०<br>– | ०.०२ | मोंडथरा घराखाली |
| ३ | (३)३ | २/९बी | ०.०४.३<br>०.००.२ | ०.४७ | मोंडथरा घराखाली |
| ४ | (८०)४३ | ३ | ०.०५.०<br>०.४९.० | ०.०६ | धुधर्मीचे काटे |
| ५ | (४११)४५ | १/७ | ०.०१.८<br>– | ०.१६ | धुधर्मीचे |
| ६ | (४१२)४६ | १/६ | ०.०२.०<br>– | ०.०३ | धुधर्मीचे काटेपैकी |
| ७ | (४०२)४८ | १/१६ | ०.०६.४<br>०.००.७ | ०.३० | धुधर्मीची खरी |
| ८ | (४०२)४८ | १/१८ | ०.०१.५<br>– | ०.०८ | धुधर्मीची खरी |
| ९ | (४०२)४८ | १/३३ | ०.०३.०<br>०.०१.० | ०.०६ | धुधर्मीची खरी |
| १० | (३७७)४९ | २ | ०.००.५<br>०.०२.३ | ०.०२ | धुधम्याचे कापानजीक |
| ११ | (८२)५२अ | १ | ०.०९.०<br>०.६८.० | ०.०५ | धुधमीचे काटेनजीक |
| १२ | (७८)५३ | २१ | २.०६.०<br>१.९९.० | १.२२ | फणस कोंडीची धार |
| १३ | (८२)५२अ | १६ | ०.३१.०<br>०.७२.० | ०.१३ | डिंगीचे कोंड |

## परिशिष्ट 'ब'

गाव मौजे मळेगाव, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील मिळकतींचा तपशील खालील प्रमाणे

| अ.नं. | सर्वे नं. | हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | (१०२)२० | १ | ०.१५.०<br>०.२१.० | ०.०६ | डिधीची कोंड |
| २ | (१०३)४५ | ११ | १.६५.०<br>०.३७.० | १.० | डिधीचे कोंडीवरील फणस कोंड |
| ३ | (१३७)५९ | ३ | ०.९२.०<br>२.७६.० | ०.५५ | काजऱ्याचा टेंब |
| ४ | (१३८)६० | १ | १.०८.०<br>३.९९.० | ०.४६ | काजऱ्याचा टेंब |
| ५ | (१४३)६४ | ३ | ०.५२.०<br>१.५५.० | ०.२७ | काजऱ्याचे टेंब |
| ६ | (१४४)६५ | १ | २.८९.०<br>२.२५.० | १.६९ | काजऱ्याचे टेंब |

## परिशिष्ट 'क'

गाव मौजे चिंचवाड, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील मिळकतींचा तपशील खालील प्रमाणे

| अ.नं. | सर्वे नं. | हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | (४५अ१क१)५१ | ११ब | ०.१२.३<br>०.०१.३ | ०.०८ | खरळाची आड |

वरील सर्व्हे वर्णनाच्या मिळकती, त्यातील झाडझाडोरा व इतर तदंगभूत वस्तूंसह दरोबस्त मिळकती हा दाव्याचा विषय आहे.

०३. वादी यांच्या कथना नुसार राम बाबला मासये हा वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबात मूळ पुरुष होता. त्यास रावजी, गोविंद, विठू आणि बाबू अशी चार मुले होती. त्यापैकी प्रतिवादी क्र.१ ते १३ हे रावजी याचे वारस आहेत. वादी स्वत: आणि प्रतिवादी क्र.२८ ते ३२ हे विठूचे वारस आहेत. प्रतिवादी क्र.२० ते २७ हे बाबूचे वारस आहेत. तर प्रतिवादी क्र.१४ ते १९ हे गोविंद याचे वारस आहेत.

०४. वादीच्या कथना नुसार दावा मिळकती या त्यांचा मूळ पुरष राम बाबला मासये यांच्या काळापासून चालत आलेल्या सामाईक मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत. त्यांच्या कुटुंबाचा दावा मिळकतीमध्ये आठ आणे हिस्सा होता. दि.०४/०१/१९९१ रोजी वादीच्या कुटुंबातील कर्ते पुरुष रामचंद्र सदाशिव मासये यांनी उर्वरित आठ आणे हिस्सा रक्कम रु.४०,०००/– रुपयांना खरेदी केला. त्यामुळे आता वादी व प्रतिवादी संपूर्ण दावा मिळकतीचे मालक झाले आहेत.

०५. वादी याच्या कथना नुसार परिशीष्ट मध्ये नमुद केल्या प्रमाणे सर्वे नं.२/२ आणि ८५/५३ मधील वडिलोपार्जित घरे, गोठे आणि मांगर प्रत्येक हिस्सेदार आपआपल्या सोयीनुसार वापरतो व स्वतंत्रपणे राहतो. त्यांची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला देखील वेगवेगळी आहे. वादी आणि प्रतिवादी यांनी सर्वे नं.८२/५३ आणि ४५/११ सारख्या जमिनींमध्ये स्वत:च्या कष्टाने आणि खर्चाने हापूस आंब्याची कलमे लावली आहेत. काही ठिकाणी १०, २० तर काही ठिकाणी ८ कलमे आहेत. प्रत्येक शाखा आपआपल्या लागवडी नुसार उत्पन्न घेत आहेत. इतर मोकळया जागेत सर्व पक्षकार आपआपल्या अंदाजा प्रमाणे भातशेती करत आहेत.

०६. वादी याच्या कथना नुसार वादी आणि काही प्रतिवादी यांनी दावा मिळकतीच्या रेकॉर्डला सहहिस्सेदार म्हणून नावे लागण्यासाठी सन २०१३ मध्ये मागणी केली होती. त्यानुसार मोंड फेरफार क्र.६४००, माळेगाव फेरफार क्र.६०९ आणि चिंचवड फेरफार क्र.२७६ मंजूर करण्यात आल्या. परंतु प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी नोंदणीस विरोध करुन अपील दाखल केले. प्रस्तुत अपील हे अपर आयुक्त कोकण विभाग यांच्या पर्यंत गेले. परंतु दिवाणी न्यायालयाचा आदेश नसल्यामुळे मागणी फेटाळली गेली.

०७. वादी याच्या कथना नुसार डिसेंबर २०१५ मध्ये वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे सर्व मिळकतींचे कायदेशीररित्या सरस-निरस वाटप करुन देण्याची विनंती केली. परंतु प्रतिवादी यांनी त्यास नकार दिला. महसूल दफ्तरी नाव लागण्यास होत असलेला विरोध आणि कायदेशीर वाटणी अभावी येत असलेल्या अडचणींमुळे वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल करुन वादी यांच्या शाखेचा १/४ हिस्सा वेगळा करुन मिळावा तसेच ज्या पक्षकारांनी ज्या जमिनीत सुधारणा केली आहे किंवा कलमे लावली आहेत ती जमिन शक्यतो त्यांच्या हिश्यास कायम ठेवावी अशी मागणी केली आहे.

०८. प्रतिवादी क्र.२, ३, १०, १३, १९अ, १९क, १९ड, २८अ, २८क, २८ड, २९ब, ३३, ३४, ३५, ३६, ३७ यांना दावा समन्सची बजावणी होऊन देखील ते प्रस्तुत हजर न झाल्याने प्रस्तुत दावा त्यांच्या विरोधात एकतर्फा चालविण्यात आला. प्रतिवादी क्र.५ ते ९, ११, १२, १४ ते २७, २८ ते ३२, १९ ब, २८ ब, २९ अ, यांनी पुरशीस दाखल करुन त्यांना दावा मान्य असल्याचे कथन केले. प्रतिवादी ४ अ ते ४ क यांनी प्रस्तुत प्रकरणी कैफियत दाखल न केल्याने दावा त्यांच्या विरोधात विना कैफियत चालविण्यात आला. तर प्रतिवादी क्र.१ यांनी हजर होऊन <u>निशाणी क्र.५७</u> येथे आपली कैफियत दाखल केली आहे.

०९. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्र.५७ येथे दाखल केलेल्या कैफियतीमध्ये वादी यांच्या दाव्यातील सर्व कथनांचा स्पष्ट शब्दांत नकार केला आहे. प्रतिवादी यांनी आपल्या कैफियतीमध्ये असे कथन केले आहे की, वादी यांनी दाव्यात सादर केलेली वंशावळ पूर्णपणे खोटी असून ती प्रतिवादी यांना मान्य नाही. प्रतिवादी यांच्यामते बाबला हे त्यांच्या कुटुंबाचे मूळ पुरुष नव्हते तसेच राम मासये यांना विठू, गोविंद व बाबू नावची मुले होती त्या विधानाचा कोणताही भक्कम पुरावा वादीकडे नाही. उलट रावजी राम मासये यांची जनाबाई नावाची मुलगी व तिचे वारस यांना वादी याने मुद्दामहून दाव्यातून वगळले आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास Non Joinder of Necessary Parties ची बाधा येते. त्यामुळे वादीचा दावा तांत्रिक दृष्टया टिकणारा नाही.

१०. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी हे केव्हाही एकत्र कुटुंबाचे सदस्य नव्हते. रावजी मासये यांची मुले त्यांच्या हयातीतच व्यवसायाने आणि निवासाने एकमेकांपासून पुर्णपणे विभक्त झाली होती. त्यामुळे दावा मिळकती या सामाईक आहेत हा वादीचा दावा चुकीचा आहे. विशेषत: परिशीष्ट अ मधील घरांचा आणि गोठयाचा ताबा हा वादीच्या पुर्वजांकडे कधीच नव्हता. त्या मिळकती केवळ प्रतिवादींच्याच ताब्यात आणि वहिवाटीत आहेत. प्रतिवादी यांच्या कथना नुसार दि.०४/०१/१९९१ रोजीचा खरेदी खताचा व्यवहार हा केवळ प्रतिवादी क्र.१ चे वडील रामचंद्र गणपत मासये यांनी त्यांच्या वैयक्तीक उत्पन्नातून पूर्ण केला होता. रामचंद्र यांनी दावा मिळकतीमध्ये स्वकष्टाने १५० हून अधिक हापूस आंब्याची कलमे लावली होती आणि त्यातून मिळालेल्या नफ्यातून त्यांनी उर्वरित आठ आणे हिस्सा रक्कम रु.४०,०००/– रुपयांना खरेदी केला. या व्यवहारात वादीच्या शाखेचे कोणतेही आर्थिक योगदान किंवा सहभाग नसल्यामुळे ही मिळकत रामचंद्र मासये यांची स्वसंपादीत मिळकत ठरते आणि तिचे वाटप इतर कोणालाही मागता येणार नाही.

११. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, मौजे चिंचवड येथील जमिनी रामचंद्र गणपत मासये यांनी कूळ म्हणून कसल्या होत्या आणि त्यांना कलम 'म' प्रमाणे खरेदी प्रमाणपत्र मिळालेले आहे. त्यामुळे अशा प्रकारे प्राप्त झालेली जमिन ही वैयक्तीक स्वरुपाची आहे आणि ती कुटुंबाच्या वाटणीचा भाग होऊ शकत नाही. महसुल दफ्तरी वादीने ज्या नोंदी करुन घेतल्या आहेत त्या बेकायदेशीर असून त्या विरुध्द प्रतिवादीने वरच्या न्यायालयात दाद मागितली आहे. थोडक्यात वादीला कोणत्याही मिळकतीत हिस्सा मिळवण्याचा कायदेशीर अधिकार नसल्यामुळे प्रस्तुत दावा खर्चासह फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे.

१२. दाव्यातील कथने व प्रतिवादी यांच्या कैफियतीचे अवलोकन करुन माझे पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्र.८० येथे मुद्दे निश्चित केले आहेत. त्या मुद्दयां वरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३२ यांच्या संयुक्त मालकीची असल्याचे वादी शाबीत करतो का ? | होकारार्थी |
| २. | रामचंद्र आणि सदाशिव यांनी स्वमिळकतीतून दावा मिळकतीपैकी २/३ हिस्सा दि.०४/०१/११९१ च्या खरेदीखताने खरेदी केल्याचे प्रतिवादी क्र.१ शाबीत करतो का ? | मुद्दा टिकणारा नाही. |
| ३. | राजेंद्र, यशवंत, वसंत, बाबाजी, प्रभावती, भिकाजी, कृष्णा, गोविंदा आणि सिताराम हे घर क्र.२७९ मध्ये राहत असल्याचे वादी यांनी शाबीत केले आहे का? | मुद्दा टिकणारा नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४. | वादी व प्रतिवादी क्र.४ ते ३२ हे दावा मिळकतीमध्ये मशागत करत असल्याचे वादी शाबीत करतो का? | होकारार्थी |
| ५. | दाव्यामध्ये दिलेली वंशावळ खरी व बरोबर असल्याचे वादी शाबीत करतो का? | होकारार्थी |
| ६. | प्रस्तुत दाव्यास Non Joinder Of Necessary Parties या तत्त्वाची बाधा येते का? | नकारार्थी |
| ७. | आदेश व हुकूमनामा काय ? | दावा अंतिम आदेशा प्रमाणे मंजूर करण्यात येतो. |

## - <u>का र ण मि मां सा</u> -

१३. वादी यांनी आपल्या दाव्यातील कथने शाबीत करण्याकरिता वादी तर्फे सा.क्र.१ म्हणून स्वत:स <u>निशाणी क्र.१०३</u> येथे तपासले आहे. तसेच, <u>निशाणी क्र.५</u> येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.२(२)/१ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, <u>निशाणी क्र.६</u> येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.३(३)/२/३बी चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, <u>निशाणी क्र.७</u> येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.३(३)/२/९बी चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, <u>निशाणी क्र.८</u> येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.४३(८०)/३ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, <u>निशाणी क्र.९</u> येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.४५(४११)/१/७ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, <u>निशाणी क्र.१०</u> येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.४६(४१२)/१/६

चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.४८(४०२)/१/१६ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.४८(४०२)/१/१८ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१३ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.४८(४४२)/१/३३ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१४ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.४९(३७७)/२ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१५ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.५२ (८२)/१ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१६ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.५३(७८)/२१ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१७ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.५२अ(८२)/१६ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१८ येथे मौजे मळेगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.२०(१०२)/१ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१९ येथे मौजे मळेगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.४५(१०३)/११ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.२० येथे मौजे मळेगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.५९(१३७)/३ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.२१ येथे मौजे मळेगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.६०(१३८)/१ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.२२ येथे मौजे मळेगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.६४(१४३)/३ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.२३ येथे मौजे मळेगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.६५(१४४)/१ चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.२४ येथे मौजे मळेगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.५१(४५अ१क१)/११ब चा सातबारा उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१०८ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील

मालमत्ता क्र.२७९अ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१०९ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९ब च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११० येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९क च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१११ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९ड१/१ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११२ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९ड१/२ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११३ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९फ१ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११४ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र. २७९फ२ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११५ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९ड२/१ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११६ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९ड२/२ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११७ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९ड२/३ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११८ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९ई१ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.११९ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र. २७९ई२ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२० येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.२७९ई३ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२१ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र. ४८६ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२२ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.६९३ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२३ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता

क्र.६३२ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२४ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.६४३ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२५ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र. ६४६ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२६ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.६९२अ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२७ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र. ५७७ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२८ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.६०७ब च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१२९ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.७६५ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१३० येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र. ५७८ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१३१ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.६९२ब च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१३२ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.७६२ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१३३ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मालमत्ता क्र.६०७अ च्या घरपत्रक उताऱ्याची स.शि. नक्कल, निशाणी क्र.१३४ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील फेरफार क्र.६४०० ची स.शि.नक्कल, निशाणी क्र.१३५ येथे अप्पर जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे कडील आर.टी.एस. अपील क्र.५३/२०१२ ची प्रत, निशाणी क्र.१३६ येथे अप्पर आयुक्त कोकण विभाग मुंबई यांचे कडील क्र.अपिल/डेस्क/ आरटीएस/रिव्ही/३११/२०१३ ची प्रत, निशाणी क्र.१३७ येथे मौजे मळेगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील फेरफार क्र.६०९ ची स.शि.नक्कल, निशाणी क्र.१३८ येथे उपविभागीय अधिकारी कणकवली यांचे कडील हक्कनोंद अपिल क्र.७५/२०१० ची प्रत, निशाणी क्र.१३९ येथे मौजे चिंचवाड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील फेरफार क्र.२७६ ची

स.शि.नक्कल, निशाणी क्र.१४१ येथे विवादग्रस्त प्रकरण नोंदवहीची प्रत, निशाणी क्र.१६७ येथे मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील फेरफार क्र.६०५६ मधील तक्रार रजिस्टरची प्रत, निशाणी क्र.१६० येथे खरेदीखतची प्रत, निशाणी क्र.१६१ येथे मौजे चिंचवाड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील फेरफार क्र.५९ ची स.शि.नक्कल, निशाणी क्र.१६२ येथे मौजे मळेगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील फेरफार क्र.१३७ ची स.शि.नक्कल, इत्यादी कागदोपत्री पुरावा हजर केला आहे. वादी यांनी निशाणी क्र.१४८ येथे पुरशीस दाखल करुन आपला पुरावा बंद केला आहे.

१४. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्र.१५३ येथे पुरशीस दाखल करुन त्यांना प्रस्तुत प्रकरणी कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा द्यायचे नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१२ यांनी निशाणी क्र.१५१ येथे पुरशीस दाखल करुन आपला पुरावा बंद केला आहे. प्रतिवादी क्र.५, ७, १९ब, १९क, २७, २८क यांनी निशाणी क्र.१५२ येथे पुरशीस दाखल करुन आपला पुरावा बंद केला आहे.

१५. वादी तर्फे वकील श्री. डी.आर.गोरे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी दाव्यातील कथना प्रमाणे युक्तीवाद करुन दावा मंजूर करण्याची विनंती केली. त्यांनी आपल्या युक्तीवादाच्या पुष्टयर्थ पुढील केस लॉ वर आपली भिस्त ठेवली आहे.

1) Vidhyadhar vs Manikkrao and anr. (AIR 1999 SUPREME COURT 1441)

2) Iswar Bhai C. Patel and Bachu Bhai Patel vs Harihar Behera and anr. (AIR 1999 SUPREME COURT 1341)

3) Dolgobinda Paricha vs Nimai Charan Misra and ors. (AIR 1959 SUPREME COURT 914)

१६. याउलट प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री. व्ही.आर.नाईक यांनी आपल्या कैफियतीमधील कथना प्रमाणे युक्तीवाद केला व दावा नामंजूर करण्याची विनंती केली. त्यांनी आपल्या युक्तीवादाच्या पुष्टयर्थ पुढील केस लॉ वर आपली भिस्त ठेवली आहे.

1) Srichand K. Khetwani vs The State of Maharashtra (AIR 1967 SUPREME COURT 450)

2) State of Bihar and ors. vs Sri Radha Krishna Singh and ors. (AIR 1983 SUPREME COURT 684)

**<u>मुद्दा क्र.६ करिता</u> :-**

१७. प्रतिवादी यांनी आपल्या कैफियतीमध्ये असे कथन केले आहे की, रावजी यांना गणपत, लक्ष्मण, सहदेव यांच्या खेरीज जनाबाई नावाची एक मुलगी होती. तीला किंवा तिच्या वारसांना वादीने प्रस्तुत प्रकरणी सामील केलेले नाही. त्यामुळे वादीच्या दाव्यास आवश्यक पक्षकारांची उणीव असल्याने वादीच्या दाव्यास Non Joinder Of Necessary Parties या तत्त्वाची बाधा येते. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी याने दाव्यामध्ये दुरुस्ती करुन जनाबाई हिच्या वारसांना प्रतिवादी केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी आपल्या दाव्यामध्ये उपस्थित केलेला मुद्दा निकाली निघाला आहे. त्यामुळे त्यामुळे मी <u>मुद्दा क्र.६</u> चे उत्तर न<u>कारार्थी</u> नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिता</u> :-**

१८. रामचंद्र आणि सदाशिव यांनी स्वकमाईने दावा मिळकतीपैकी २/३ हिस्सा दि.०४/०१/१९९१ च्या खरेदीखताने खरेदी घेतल्याचे प्रतिवादी क्र.१ शाबीत करतो का असा आहे. परंतु वादीच्या दाव्यातील कथने आणि त्यास प्रतिवादी यांनी दाखल केलेली कैफियत पाहीली असता, कोठेही रामचंद्र आणि

सदाशिव यांनी दावा मिळकतीपैकी २/३ मिळकत दि.०४/०१/१९९१ च्या खरेदीखताने विकत घेतली असल्याचे वादी अगर प्रतिवादी यांचे म्हणणे असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा मुद्दा हा चुकीच्या पध्दतीने काढला गेला असल्यामुळे त्यावर कारणमिमांसा देणे आवश्यक वाटत नाही. त्यामुळे प्रस्तुत मुद्दयावर <u>मुद्दा टिकत नाही</u> असा निष्कर्ष देता येईल.

**<u>मुद्दा क्र.३ करिता</u> :-**

१९. राजेंद्र, यशवंत, वसंत, बाबाजी, प्रभावती, भिकाजी, कृष्णा, गोविंदा आणि सिताराम हे घर क्र.२७९ मध्ये राहत असल्याचे वादी यांनी शाबी केले आहे का असा मुद्दा काढण्यात आला आहे. परंतु वादीच्या दाव्यातील मागणी पाहिली असता वादीने आपल्या दाव्यामध्ये कोठेही घर मिळकतीचे वाटप करुन मागितलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा मुद्दा देखील टिकणारा नाही. त्यामुळे प्रस्तुत मुद्दयावर <u>मुद्दा टिकत नाही</u> असा निष्कर्ष देता येईल.

**<u>मुद्दा क्र.१, ४ व ५ करिता</u> :-**

२०. वादीच्या दाव्यातील कथने व त्यास प्रतिवादी यांनी दाखल केलेली कैफियत यांचे विश्लेषण केले असता प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वादी यांनी नमुद केलेली वंशावळ खरी व बरोबर आहे का हा अत्यंत महत्त्वाचा व निर्णायक मुद्दा असल्याचे दिसून येते.

२१. वादी यांच्या कथना नुसार राम बाबला मासये हा वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबात मूळ पुरुष होता. त्यास रावजी, गोविंद, विठू आणि बाबू अशी चार मुले होती. त्यापैकी प्रतिवादी क्र.१ ते १३ हे रावजी याचे वारस आहेत. वादी स्वत: आणि प्रतिवादी क्र.२८ ते ३२ हे विठूचे वारस आहेत. प्रतिवादी क्र.२० ते २७ हे बाबूचे वारस आहेत. तर प्रतिवादी क्र.१४ ते १९ हे गोविंद याचे वारस

आहेत. वादीच्या कथना नुसार दावा मिळकत ही वादी आणि प्रतिवादी यांची सामाईक मिळकत आहे. प्रतिवादी यांनी आपल्या कैफियतीमध्ये वादी यांनी दाव्यात दिलेली वंशावळ पूर्णत: नाकारली आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, बाबला हे त्यांच्या कुटुंबाचे मूळ पुरुष नव्हते तसेच राम मासये यांना विठू, गोविंद व बाबू नावची मुले होती त्या विधानाचा कोणताही भक्कम पुरावा वादीकडे नाही.

२२. जरी प्रतिवादी क्र.१ यांनी वादी याने दाखल केलेल्या वंशावळीवर आक्षेप घेतला असला तरी वादी याने निशाणी क्र.१४१ व निशाणी क्र.१६७ येथे हजर केलेला कागदोपत्री पुरावा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. हा दस्तऐवज प्रतिवादी क्र.१ ते ३ चे वडील दिवंगत रामचंद्र गणपत मासये यांनी दि.१२/१०/१९९३ रोजी नायब तहसिलदार, देवगड यांच्या समोर मौजे मोंड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील फेरफार क्र.६०५६ मधील तक्रार प्रकरणी दिलेला जबाब आहे. प्रस्तुत जबाबाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, रामचंद्र मासये यांनी वादी याने प्रस्तुत दाव्यात दिलेल्या वंशावळीला स्पष्टपणे मान्यता दिली आहे.

२३. प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री. व्ही.आर. नाईक यांनी असा युक्तीवाद केला की, महाराष्ट्र जमिन महसुल संहिता कलम २३७ नुसार रामचंद्र यांचा जबाब प्रस्तुत प्रकरणी पुराव्यात वाचता येणार नाही. परंतु कायदेशीर परिस्तिथी अशी आहे कि, जरी एम.अल.आर.सी नुसार झालेली चौकशी हे महसुली कारणासाठी झालेली असली तरी त्यामध्ये दिलेली कबुली हे भारतीय पुरावा कायदा कलाम १८ नुसार दिवाणी न्यायालयात सुसंगत ठरतो. कारण जरी ती कार्यवाही संक्षिप्त असली तरी ती एका कायदेशीर अधिकाऱ्यांसमोर झालेली न्यायिक कार्यवाही असते. महसुल दफ्तरातील नोंदी मालकी हक्क ठरवत नसून केवळ महसुली प्रयोजनासाठी असल्या तरी त्यातील कबुली ही दिवाणी दाव्यात नातेसंबंध आणि कुटुंबाची स्थिती शाबीत करण्या करिता एक स्वतंत्र आणि ठोस

पुरावा मानली जाते. रामचंद्र मासये यांचा जबाब हा एका सार्वजनिक प्राधिकाऱ्या समोर (Public Officer) दिला असल्याने त्याला public document चे स्वरुप प्राप्त होते. त्यामुळे प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद कायद्याच्या कसोटीवर टिकणारा नाही.

२४. याउलट, भारतीय पुरावा कायदा कलम १८(२) नुसार दाव्यातील पक्षकारांनी दाव्याच्या विषयवस्तू मधील आपला हितसंबंध ज्यांच्या कडून प्राप्त केला त्या व्यक्तीनी केली असतील ती कथने जर ती करणाऱ्या व्यक्तीचा हितसंबंध अस्तित्वात असताना केलेली असतील तर अशी कथने म्हणजे 'कबुली' (Admission) होय. त्यामुळे अशी कबुली ही त्यांच्या कायदेशीर वारसांवर बंधनकारक असते. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कोठेही रामचंद्र मासये हे त्यांचे वडील असल्याचे नाकारलेले नाही. त्यामुळे रामचंद्र मासये यांनी दि.१२/१०/१९९३ रोजी नायब तहसिलदार, देवगड यांच्या समोर दिलेला जबाब व त्यातील कथने निश्चीतच प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्यावर प्रस्तुत दाव्यातील वाद विषया विषयी बंधनकारक आहे. तसेच रामचंद्र मासये आता हयात नसल्याने कलम भारतीय पुरावा कायदा कलम ३२(५) अन्वये देखील त्यांच्या पुर्व कबुलीला विशेष महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे तांत्रिक कारणास्तव निशाणी क्र.१४१ व १६७ येथील कागदोपत्री पुरावा नाकारता येणार नाही. वरील सर्व विवेंचनातून असे दिसून येते की, वादी यांनी मांडलेली वंशावळ ही केवळ काल्पनिक नसून ती प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या पुर्वजांना देखील मान्य होती हे शाबीत होते. रामचंद्र मासये यांनी १९९०-९३ च्या दरम्यान महसुल प्रशासना समोर दिलेली विधाने ही कोणत्याही वादापुर्वीची (Ante Litem Motam) असल्याने ही अधिक विश्वासार्ह वाटतात. प्रतिवादी यांनी केवळ बचावासाठी वंशावळ नाकारली आहे. मात्र त्याला पुष्टी देणारा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. याउलट, वादी यांनी निशाणी क्र.१४१ व १६७ वरील कागदोपत्री पुराव्या आधारे आपले कथन शाबीत केले आहे. त्यामुळे वंशावळ शाबीत होत असल्याचा

निष्कर्ष काढण्यात येत आहे.

२५. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.१ यांनी आपल्या कैफियतीमध्ये दि.०४/०१/१९९१ रोजीचा खरेदी खताचा व्यवहार हा केवळ प्रतिवादी क्र.१ ते ३ चे वडील रामचंद्र गणपत मासये यांनी त्यांच्या वैयक्तीक उत्पन्नातून पूर्ण केला होता, रामचंद्र यांनी दावा मिळकतीमध्ये स्वकष्टाने १५० हून अधिक हापूस आंब्याची कलमे लावली होती आणि त्यातून मिळालेल्या नफ्यातून त्यांनी उर्वरित आठ आणे हिस्सा रक्कम रु.४०,०००/- रुपयांना खरेदी केला असल्याने ही मिळकत रामचंद्र मासये यांची स्वसंपादीत मिळकत ठरते असे कथन केले आहे. तसेच मौजे चिंचवड येथील जमिनी रामचंद्र गणपत मासये यांनी कूळ म्हणून कसल्या होत्या आणि त्यांना कलम 'म' प्रमाणे खरेदी प्रमाणपत्र मिळालेले आहे. त्यामुळे अशा प्रकारे प्राप्त झालेली जमिन ही वैयक्तीक स्वरुपाची आहे आणि ती कुटुंबाच्या वाटणीचा भाग होऊ शकत नाही असे कथन केल्याचे दिसून येते.

२६. वादीच्या कथना नुसार दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची सामाईक मिळकत आहे. याउलट, प्रतिवादी क्र.१ यांनी आपल्या कैफियतीमध्ये असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही त्याच्या वडिलांची स्वकष्टार्जित (self acquired) मालमत्ता असून ती त्यांनी स्वतःच्या उत्पन्नातून खरेदी केली आहे. कायद्याच्या प्रस्थापित तत्त्वानुसार जेव्हा एखादी व्यक्ती मालमत्ता ही स्वकष्टार्जित असल्याचा दावा करते, तेव्हा ती सिध्द करण्याची जबाबदारी (onus of proof) त्या व्यक्तीवर म्हणजेच प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांच्यावर आहे. जरी सुरवातीचा पुराव्याचा भार (Initial Burden) हे वादीवर असले तरी एकदा का प्रतिवादीने ती मालमत्ता स्वकष्टार्जित असल्याचा विशीष्ट बचाव घेतला की, पुराव्याचा ओढा (Onus of Proof) प्रतिवादीकडे सरकतो. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांच्या वडिलांना प्रस्तुत प्रकरणी दावा मिळकत खरेदी करण्या करिता त्यांच्याकडे उत्पन्नाचे स्त्रोत होते आणि त्या खरेदी व्यवहारासाठी सामाईक कुटुंबाच्या

कोणत्याही निधीचा वापर करण्यात आलेला नाही हे शाबीत करावे लागेल. केवळ मालमत्ता स्वत:च्या नावे असणे हे ती मालमत्ता स्वकष्टार्जित असल्याचा निर्णायक पुरावा मानला जाऊ शकत नाही जो पर्यंत त्या खरेदीसाठी लागलेला मोबदला हा स्वत:च्या खाजगी उत्पन्नातून दिल्याचे सिध्द होत नाही.

२७. परंतु प्रतिवादी क्र.१ कथन करतात त्या प्रमाणे दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या वडिलांची स्वकष्टार्जित मिळकत आहे ही बाब शाबीत करण्या करिता प्रतिवादी क्र.१ हे स्वत: साक्ष देण्यासाठी न्यायालयात हजर झाले नाहीत. तसेच त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत प्रकरणी हजर केला नाही.

२८. प्रतिवादी तर्फे वकील श्री.व्ही.आर.नाईक यांनी असा युक्तीवाद केला की, कायदेशीर बाबींमध्ये, प्रतिकूल अनुमान हे तेव्हाच काढले जाऊ शकते जेव्हा एखाद्या पक्षाने पुराव्यांची जाणीवपूर्वक लपवाछपवी केली असेल, केवळ पुरावे गोळा करण्यात अपयश आल्यामुळे प्रतिकूल अनुमान काढता येत नाही. आपल्या युक्तीवादाच्या पुष्टर्थ त्यांनी Srichand K. Khetwani vs The State of Maharashtra (AIR 1967 SUPREME COURT 450) या केस लॉ वर आपली भिस्त ठेवली आहे. प्रस्तुत केस लॉ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालय यांनी असे कथन केले आहे की, Failure to obtain evidence – adverse inference can be drawn only if there is withholding of evidence and not merely on account of failure to obtain evidence. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.१ यांच्या कथना नुसार दावा मिळकत ही त्यांचे वडील रामचंद्र मासये यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. परंतु प्रस्तुत बाब शाबीत करण्या करिता प्रतिवादी क्र.१ यांनी साक्षी करिता हजर न होणे ही एक प्रकारची पुराव्यांची जाणीवपुर्वक केलेली लपवाछपवी आहे. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वर नमुद केस लॉ मध्ये मांडलेले मत प्रस्तुत प्रकरणी लागू होत नाही. याउलट, विद्याधर विरुध्द माणिकराव आणि अन्य AIR 1999 SUPREME COURT 1441 या खटल्यामध्ये,

भारताच्या मा. सर्वोच्च न्यायालयाने पुराव्यांचे मूल्यमापन आणि कराराचा अर्थ लावणे यासंबंधी काही अत्यंत महत्त्वपूर्ण तत्त्वे प्रस्थापित केली. यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे अधोरेखित केले की, जर एखादा पक्षकार आपली बाजू शपथपूर्वक मांडण्यासाठी साक्षीदार पिंजऱ्यात उभा राहिला नाही, तर त्यावरून त्याच्या विरोधात प्रतिकूल निष्कर्ष काढला जाऊ शकतो; आणि यावरून असे सूचित होते की, त्याने आपल्या लेखी निवेदनात (pleadings) मांडलेली बाजू चुकीची असण्याची शक्यता आहे. तसेच भारतीय पुरावा कायदा कलम ११४(ग) देखील महत्त्वाचा वाटतो. तो पुढील प्रमाणे - "प्रतिकूल निष्कर्ष भारतीय पुरावा कायदा, कलम 114(g)- जेव्हा एखादा पक्षकार ज्याला खटल्यातील तथ्यांची प्रत्यक्ष व वैयक्तिक माहिती असते तो उलटतपासणीला सामोरे जाण्यासाठी साक्षीदार पिंजऱ्यात उपस्थित राहत नाही, तेव्हा असे गृहीत धरले जाते की, त्याने आपल्या लेखी निवेदनात मांडलेली बाजू ही असत्य आहे."

२९. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी यांनी साक्ष न देणे तसेच कोणताही कागदोपत्री पुरावा हजर न करणे या सर्वांचा साकल्याने एकत्रितपणे विचार केला असता पुराव्या अभावी प्रतिवादी यांचा 'स्वसंपादित मालमत्तेचा' बचाव केवळ कागदोपत्री राहिला असून तो सिध्द करण्यात प्रतिवादी हे पुर्णत: अपयशी ठरले आहेत.

३०. एकंदरीत वादी यांच्या दाव्यातील कथने, त्यांनी दाखल केलेला पुरावा यांचा साकल्याने विचार केला असता वादी यांनी दाव्यामध्ये दिलेली वंशावळ खरी व बरोबर असल्याचे वादी यांनी शाबीत केले आहे. तसेच दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या सामाईक मालकी वहिवाटीची असल्याचे शाबीत होते. वरील सर्व बाबींचा विचार केला असता मी <u>मुद्दा क्र.१, ४ व ५</u> चे उत्तर <u>होकारार्थी</u> नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.७ करिता</u>** :-

३१. एकंदरीत वादी यांच्या दाव्यातील कथने, त्यास प्रतिवादी क्र.१ यांनी दाखल केलेली कैफियत, वादी तर्फे दाखल तोंडी व कागदोपत्री पुरावा तसेच वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद यांचा साकल्याने विचार करुन मी मुद्दा क्र.१, ४, ५ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे. तर मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर मुद्दा टिकणारा नाही असे नोंदवत आहे. <u>मुद्दा क्र.६</u> चे उत्तर <u>नकारार्थी</u> नोंदवत आहे. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मिळकत असल्याचे शाबीत झाल्याने त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचा सामाईक हिस्सा आहे. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी हे <u>मुद्दा क्र.७</u> करिता पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. दावा मंजूर करण्यात येतो.

२. दावा मिळकतीमध्ये वादी यांचा १/३२ हिस्सा, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/९६ हिस्सा, प्रतिवादी क्र.४अ, ४ब, ४क यांचा प्रत्येकी १/९६ हिस्सा, प्रतिवादी क्र.५ ते १० यांचा प्रत्येकी १/९६ हिस्सा, प्रतिवादी क्र.१ ते १३ यांचा प्रत्येकी १/४८ हिस्सा, प्रतिवादी क्र.१४ ते १८ यांचा प्रत्येकी १/४० हिस्सा, प्रतिवादी क्र.१९अ, १९ब, १९क यांचा प्रत्येकी १/२४ हिस्सा, प्रतिवादी क्र.२० ते २५ यांचा प्रत्येकी १/७२ हिस्सा, प्रतिवादी क्र.२६ यांचा १/१२ हिस्सा, प्रतिवादी क्र.२७ यांचा १/१२ हिस्सा, प्रतिवादी क्र.२८अ, २८ब, २८क, २८ड यांचा प्रत्येकी १/६४ हिस्सा, प्रतिवादी क्र.२९अ,

२९ब यांचा प्रत्येकी १/३२ हिस्सा, प्रतिवादी क्र.३० ते ३२ यांचा प्रत्येकी १/३२ हिस्सा, प्रतिवादी क्र.३४ ते ३७ यांचा प्रत्येकी १/६४ हिस्सा, असल्याचे जाहिर करण्यात येते.

३. वादी व प्रतिवादी यांच्या कब्जास असलेले क्षेत्र वाटपामध्ये प्राधान्याने त्यांच्या हिश्यास नेमुन देण्यात यावे.

४. दावा शेत मिळकतीचे वर नमूद केल्याप्रमाणे वाटप महाराष्ट्र तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्यातील तरतूदीस अधीन राहून करण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ अन्वये हुकूमनामा जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडे पाठविण्यात यावा.

५. वादी व प्रतिवादी यांनी आपआपला खर्च सोसावा.

६. येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.04.16 16:30:43 +0530

स्थळ : देवगड
दिनांक:१६/०४/२०२६

( श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
देवगड